**ठळक बातम्या**

- शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी केवळ ३५ टक्के उद्दिष्ट २०३० सालापूर्वी पूर्ण होऊ शकतील अशी संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांची स्पष्टोक्ती

- चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या निर्यातीत ६ टक्के वाढ

- महाराष्ट्र हे देशातलं सर्वात मोठं इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेलं राज्य ठरेल असा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचा विश्वास

- राष्ट्रवादी काँग्रेस शरद्चंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्लांचं पृथ्वीवर पुनरागमन

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेते, निर्माते धीरज कुमार यांचं निधन

**<><><><><>**

शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी केवळ ३५ टक्के उद्दिष्ट २०३० सालापूर्वी पूर्ण होऊ शकतील असं संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी म्हटलं आहे. ते शाश्वत विकास उद्दिष्ट २०२५ अहवालाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. शाश्वत विकास उद्दिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करण्यात आलेलं अपयश जागतिक विकासातली आणीबाणीची परिस्थिती दर्शवत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

जगातले ८०० दशलक्ष पेक्षा जास्त लोक आजही अत्यंत गरिबीत असून जवळजवळ १८ टक्के उद्दिष्ट गाठण्यात आपण मागे राहिल्याचं ते म्हणाले. हवामान बदल, कर्ज संकट आणि जागतिक संघर्ष उद्दिष्टपूर्तीमध्ये अडथळा ठरत असल्याचं सांगून त्यांनी गाझा, युक्रेन, सुदान आणि पश्चिम आशियामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचं आवाहन केलं.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या एकूण निर्यातीत ६ टक्के वाढ नोंदवली गेली असून, गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ती २१० अब्ज पेक्षा जास्त असल्याचं वाणिज्य आणि उद्योग सचिव सुनील बर्थवाल यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं माध्यमांशी बोलत होते.

जून महिन्यात देशाच्या आयातीत ३ पूर्णांक ७१ टक्के घट होऊन ती ५३ अब्ज ९२ कोटी डॉलर्सवर आली. तर, व्यापारी आणि सेवा क्षेत्राची एकूण निर्यात ६७ अब्ज ९८ कोटी डॉलर्सवर पोहोचली, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

महाराष्ट्र हे देशातलं सर्वात मोठं इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेलं राज्य ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केला. प्रसिद्ध इलेक्ट्रिक कार निर्माता कंपनी टेस्लाने भारतीय बाजारात प्रवेश केला असून मुंबईत त्यांच्या पहिल्या सेंटरचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज झालं, तेव्हा ते बोलत होते.

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री**

मुंबईनंतर भारतातील आणखी दोन शहरांमध्ये सेवा विस्तारित केली जाणार असून, मुंबईत चार मोठे चार्जिंग हब आणि ३२ चार्जिंग स्टेशन उभारली जात असल्याची माहितीही फडनवीस यांनी यावेळी दिली.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून विधानपरिषदेचे आमदार शशिकांत शिंदे यांची निवड आज करण्यात आली. आता ते जयंत पाटील यांची जागा घेतील. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, जयंत पाटील, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड यांच्यासह इतर महत्त्वाच्या नेत्यांची मुंबईत बैठक झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. अनिल देशमुख यांनी शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला

आणि त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शरद पवार आणि मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिंदे यांचं अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला आणि ॲक्सियॉम फोर मोहिमेतले त्यांचे ३ सहकारी आज पृथ्वीवर सुखरुप परतले. अंतराळ स्थानकातून त्यांना घेऊन काल निघालेलं स्पेस एक्सचं ड्रॅगन अंतराळ यान आज कॅलिफोर्नियात सॅन दियागोच्या किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरात कोसळलं. हे अंतराळवीर आता पृथ्वीवरच्या वातावरणाशी जुळवून घेण्याकरता ७ दिवस पुनर्वसन कार्यक्रमात राहतील. १८ दिवसांच्या अंतराळ मुक्कामात शुक्ला यांनी भारतासाठी ७ वेगवेगळे प्रयोग केले आहेत. आकाशगंगा अशा नावाने भारतात ओळखली जाणारी ही मोहीम ॲक्सियॉम स्पेस कंपनी, नासा आणि इसरोचा संयुक्त प्रकल्प होता.

**<><><><>**

ॲक्सियॉम फोरच्या चमूचं मोठ्या जल्लोषात स्वागत झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ग्रुप कॅप्टन शुक्ला यांचं समाजमाध्यमावरुन अभिनंदन केलं आहे. या मोहिमेतली शुक्ला यांची भूमिका भारताच्या अंतराळविषयक प्रगतीतला मैलाचा दगड ठरला असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी साऱ्या देशासह आपण शुक्ला आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं स्वागत करत असल्याचं म्हटलं आहे. शुक्ला यांचं कार्य देशाच्या गगनयान मोहिमेतलं पुढचं पाऊल असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

भारताच्या सुपुत्राचं पृथ्वीवर यशस्वी पुनरागमन ही अभूतपूर्व घटना असल्याची प्रतिक्रीया केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी दिली आहे. ग्रुप कॅप्टन शुक्ला पुनर्वसन कार्यक्रमानंतर १७ ऑगस्टच्या सुमाराला

मायदेशी परतण्याची शक्यता असल्याचं त्यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं.

'ॲक्सिओम-४' या यशस्वी मोहिमेमुळे भारतीयांचा अवकाश संशोधन क्षेत्रातला आत्मविश्वास दुणावला असून भारतीय तरुणांसाठी ही मोहीम प्रेरणादायी ठरणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते आणि निर्माते धीरज कुमार यांचं आज दीर्घ आजारानं मुंबईत निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर कोकिलाबेन रुग्णालयात उपचार सुरू होते. आज त्यांची प्राणज्योत मालवली. समाज माध्यमांवर कुमार यांच्या निधनाचं वृत्त प्रसृत झाल्याचं हिंदुस्थान समाचारने दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

धीरज कुमार यांनी १९७० आणि १९८०च्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीत अनेकविध भूमिका केल्या. रोटी, कपडा और मकान, स्वामी, क्रांती, हिरा पन्ना अशा अनेक चित्रपटांमध्ये ते झळकले होते. हिंदीखेरीज त्यांनी पंजाबी चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे. दूरदर्शनवरच्या ओम नमः शिवाय, श्री गणेश, जय संतोषी मां आणि जप तप व्रत अशा मालिकांची निर्मितीही धीरज कुमार यांनी केली आहे.

**<><><><><>**

उर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांकडून व्हावा यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने केंद्रीय उर्जामंत्री मनोहर लाल यांनी आज एका योजनेला आरंभ केला. ADEETIE अर्थात औद्योगिक संस्थांमधील उर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान विकसनासाठी सहाय्य या योजनेच्या माध्यमातून उर्जा कार्य़क्षम तंत्रज्ञानाच्या वापरासाठी उद्योगांनी घेतलेल्या कर्जावर अनुदान देण्यात येईल. या योजनेला आज हरयाणातल्या पानिपत इथं सुरुवात झाली. या योजनेमुळे उद्योगांचा

खर्च कमी होऊन पर्यावरण  संरक्षण वाढेल, असं मनोहर लाल यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री कुसुम योजनेला राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशात मिळालेल्या यशानंतर आता केंद्र सरकार लवकरच प्रधानमंत्री कुसुम योजनेचा दुसरा टप्पा सुरू करणार असल्याची घोषणा नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी केली आहे.

नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदारांनी सौर, पवन आणि जैव इंधनांपासून वीजनिर्मितीसाठी दिलेल्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाल्याचंही जोशी यावेळी म्हणाले.

IIT मुंबईतल्या NCPRE म्हणजे राष्ट्रीय फोटोव्होल्टीक संशोधन अणि शिक्षण संस्थेला प्रल्हाद जोशी यांनी आज भेट दिली. उच्च दर्जाच्या  आणि  कमी खर्चाच्या सोलर सेलसंबधात  NCPRE करत असलेले मूलभूत काम देशाच्या सौर उर्जेच्या भावी काळाचं रुप बदलून टाकणारं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आज उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची नवी दिल्लीत भेट घेतली. येत्या २१ जुलैपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज उत्तम व्हावं ही विरोधी पक्षाची इच्छा आहे. यंदाच्या अधिवेशनात जनतेसाठीच्या अनेक धोरणात्मक, राजकीय, सामाजिक- आर्थिक विषयांवर चर्चा होणं आवश्यक असल्याचं खरगे आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.

**//<><><><><>//**